# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

ऐक्य

# भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम यांचे विचार प्रेरणादायी : अमरसिंह पाटणकर

▲पाटण, दि. १८ : भारताचे माजी राष्ट्रपती, थोर संशोधक, भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्यात असणारा आत्मविश्वास, कणखर मन आणि दिलदार स्वभाव यामुळे डॉ. कलाम यांनी आपल्या विचारांनी सर्वांना भारावून टाकले होते. डॉ. आर ए. कुंभार यांच्या भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम व्यक्तिवेध या पुस्तकातून आपणास डॉ. कलाम यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू पहावला मिळतील, असे मत कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर यांनी व्यक्त केले.



मार्गदर्शन करताना अमरसिंह पाटणकर, व्यासपीठावर राजेंद्र लाटकर, बी. एस. पवार, अरुण काकडे, डॉ. एस. डी. पवार, डॉ. प्रा. सौ. एच. व्ही. काटे, त्रिनेत्रनाथ जोशी.

येथील कोयना एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम सभागृहात आयक्यूएसी तसेच महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, शाखा पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित डॉ. आर. ए. कुंभार लिखित भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम व्यक्तिवेध पुस्तकाचे प्रकाशन तसेच चित्रकार बी. एस. पवार यांनी रेखाटलेल्या डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या तैलचित्राच्या अनावरणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी शिक्षण मंडळ, कराडचे सहसचिव राजेंद्र लाटकर, चित्रकार बी. एस. पवार, प्रकाशक अरुण काकडे, प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, आयक्यूएसी समन्वयक डॉ. प्रा. सौ. एच. व्ही. काटे,विजया वितरणचे त्रिनेत्रनाथ जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

अमरसिंह पाटणकर म्हणाले, प्रत्येक क्षण आनंदात जगायला पाहिजे. चांगल्या माणसांकडून प्रेरणा घेवून चांगले काम केले पाहिजे. डॉ. कुंभार सरांचे पुस्तक नक्कीच सर्वांना आवडेल तसेच सर्वांनी पुस्तके वाचली पाहिजेत.

पुस्तकाचे लेखक डॉ. आर. ए. कुंभार म्हणाले, शिक्षक हा लेखक असतो ही संकल्पना एस. एस. सी. बोर्डात राबविली होती. त्याचा फायदा झाला. संवाद विद्यार्थी मित्रांशी हे पहिले पुस्तक कोयना एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून प्रकाशित झाले. डॉ. अब्दुल कलाम यांच्यावर शंभर व्याख्याने देण्याचे भाग्य लाभले. त्यातूनच भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम व्यक्तिवेध हे पुस्तक तयार झाले.

यावेळी ए. एल सपकाळ यांनी डॉ. कलाम एक विद्यार्थी, प्रा. डी. डी. थोरात यांनी डॉ. कलाम एक शास्त्रज्ञ, संजय इंगवले यांनी ग्रंथप्रेमी डॉ. कलाम, प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांनी कलाम एक शिक्षक, चंद्रहार निकम यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनातील काही निवडक प्रसंग यावर मनोगत व्यक्त केले. प्रा. डॉ. सौ. एच. व्ही. काटे यांनी प्रास्ताविक केले. प्रकाशक अरुण काकडे यांनी लेखक डॉ. आर. ए. कुंभार तसेच त्यांच्या साहित्य संपदेचा परिचय करून दिला. प्रा. डॉ. विनायक राऊत यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. पी. जे. ऐवळे यांनी आभार मानले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, साहित्य परिषदेचे पदाधिकारी, सदस्य, शहर तसेच परिसरातील शिक्षण प्रेमी, ग्रंथप्रेमी नागरिक व शिक्षक उपस्थित होते.